# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)
**५८३/ब, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे-४११ ०३७**
**Email: bdbranch.ho@mswc.in/ website: www.mswc.in**

## निविदा (Short Tender Notice)

**महामंडळाच्या खालील वखार केंद्रावर प्रति गोदाम अंदाजे १५० चौ.फुट मोकळी जागा मोबाईल टॉवर्सच्या उभारणीकरिता भाडेतत्वावर देणेबाबत.**

| अ.क्र. | वखार केंद्राचे नाव | दिनांक |
|---|---|---|
| १. | पुसद, ब्रम्हपुरी, वणी (ना.), नंदुरबार, जालना शहर, श्रीरामपूर, वाई, अकोट, मालेगाव (अकोला), मंगरुळपीर, बसमतनगर | दि.०१.०१.२०२५ पुढे ३ वर्षाकरिता |
| २. | चिखली, मालेगाव (ना.) | दि.०१.०७.२०२५ पासून पुढे ३ वर्षाकरिता |
| ३. | छत्रपती संभाजीनगर बी-२३, गडचिरोली, वाडीहिंगणा, मानवत | दि.०१.१२.२०२५ पासून पुढे ३ वर्षाकरिता |

प्रत्येक वखार केंद्रावरील १५० चौ.फुट मोकळी जागा मोबाईल टॉवर्सच्या उभारणीसाठी भाडेतत्वावर देणेकरीता दर मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक निविदाकारांनी दरपत्रक सिलंबद लिफाफ्यात वरील पत्यावर दि.०६.०१.२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहच होतील अशा बेताने पाठवाव्यात किंवा स्वत: प्रत्यक्ष पोहच कराव्यात.

- **निविदेमधील अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येतील.**
- **वरील सर्व निविदा कोणतेही कारण न देता, निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी राखून ठेवलेला आहे.**

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

CamScanner

मोबाईल टॉवरर्सच्या उभारणीकरिता निविदेमधील अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध कराव्यात.

## मोबाईल टॉवरर्सच्या उभारणीकरिता निविदेमधील अटी व शर्ती

- निविदा मध्ये मोकळया जागेचे एकूण भाडे दर रु. प्रति चौ.फुट प्रति माह तसेच प्रति वर्षी भाडे दरात किती टक्के दरवाढ करण्यात येईल याप्रमाणे नमुद करावे. यामध्ये जीएसटी कर स्वतंत्र असेल.
- निविदा सिलबंद लिफाफ्यात उपमहाव्यवस्थापक (व्यवि), महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, ५८३/ब, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे- ४११ ०३७ यांच्या नावाने पाठवावी.
- सिलंबद लिफाफ्यावर निविदा धारकाचे संपूर्ण नाव, पत्ता व दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक,Email लिहावा.
- प्राप्त निविदा मध्ये ज्या निविदा धारकाचे दर जास्त असतील त्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
- दरपत्रक मंजूर निविदाधारकास वखार महामंडळाच्या सर्व अटी व शर्ती करारनाम्यानुसार लागू राहतील.
- मोबाईल टॉवर मुळे महामंडळाच्या गोदामांस व कुंपण भिंतीस कसलीही बाधा पोहोचणार नाही यांची संपूर्ण जबाबदारी निविदाकार यांची राहील.
- मोबाईल टॉवर उभारणीसाठी महाराष्ट्र शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, किंवा इतर आवश्यक सक्षम अधिकाऱ्यांकडून परवानगी घेणेची संपूर्ण जबाबदारी निविदाकार यांची राहील.
- मोबाईलच्या प्रत्येक टॉवरकरीता निविदेमध्ये नमूद केलेला दर हा प्रति चौ.फुट प्रति माह (जीएसटी वगळून) भाडे दर लागू राहील. तीन महिन्याचे मोबाईल टॉवर्सचे भाडे विनाव्याज सुरक्षा तारण ठेव रक्कम म्हणून महामंडळाकडे अग्रिम स्वरुपात जमा करणे बंधनकारक राहील.
- भाडे दरावर प्रतिवर्षी किती टक्के प्रमाणे दरवाढ देणार याबाबत निविदेमध्ये सुस्पष्ट उल्लेख करावा.
- सदर मोबाईल टॉवर्सच्या उभारणीबाबत करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील नमूद दराने प्रत्येक महिन्याला १० तारखेपर्यंत भाडे रक्कम महामंडळाच्या खात्यावर RTGS/NEFT द्वारे जमा करणे निविदाकार यांना बंधनकारक राहील. भाडे अदायगीसाठी Bill/Invoice/Demend note/Etc यांची आवश्यकता राहणार नाही.
- विलंबाने जमा केलेल्या भाड्यावर २% प्रतिमाह या प्रमाणे विलंब आकाराची आकारणी निविदाकार यांचेकडे करण्यात येईल.
- मोबाइल टॉवरची स्थापना पूर्ण झाल्यावर किती मोबाईल / टेलिकॉम / आयएसपी कंपन्या इत्यादी यांना टॉवर वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे याबाबतचे प्रमाणपत्र निविदाकार यांनी महामंडळाकडे सादर करणे आवश्यक राहील.
- सदरचे आरक्षण दर हे केवळ एका टेलिकॉम सेवेसाठी/कंपनीसाठी लागू राहतील. जर एकच टॉवर एका पेक्षा अधिक कंपन्यांचे नेटवर्क साठी वापरात आणला जाणार असेल तर प्रत्येक कंपनीकरीता ५०% अतिरिक्त शुल्क आकारणी करण्यात येईल.
- निविदाकार यांनी परस्पर त्रयस्थ कंपनी अथवा व्यक्तीस सदरचे मोबाईल टॉवर चालविणेस दिल्यास किंवा भाड्याने दिल्यास त्यांचेकडून देय दरमहा भाड्याच्या दहापट दंड वसूल करण्यात येईल.
- मोबाईल टॉवर साठी आवश्यक वीज पुरवठा मिळविणे व वीज देयक वेळेवर भरणा करणेची जबाबदारी निविदाकार यांची राहील.
- मोबाईल टॉवर्सच्या भाडेतत्वावरील आरक्षण कालावधीचा (तीन वर्षांचा) नोंदणीकृत करारनामा निविदाकार यांच्याशी करण्यात येईल. त्यांचा संपुर्ण खर्च निविदाकारांने स्वत: करणे बंधनकारक आहे.

CamScanner

- करारनामा संपुष्टात आणणेसाठी निविदाकार यांनी किंवा महामंडळाने किमान तीन महिने आधी तशी नोटीस देणे किंवा निविदाकार यांनी तीन महिन्यांचे भाडे महामंडळास जमा करणे आवश्यक राहील.
- प्रथम तीन वर्षे कालावधीमध्ये निविदाकार यांचेशी येणाऱ्या व्यवसायीक अनुभवाचे मुल्यांकनाच्या आधारे करारनाम्यास समान टप्प्याने आवश्यक मुदतवाढ देण्याबाबत भविष्यात विचार करण्यात येईल.

वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे निविदाकारांने दरपत्रका सोबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

******

CamScanner